N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** अंबी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0106 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/06/2023 23:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 22/11/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/11/2022
**Time From (वेळेपासून):** 14:14 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:42 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/06/2023 **Time (वेळ):** 23:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/06/2023 23:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आनाळा ,परंडा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** किरण गोकुळ औसरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ईनगोंदा ,परंडा,अंबी,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ईनगोंदा ,परंडा,अंबी,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश मुकादम | | | 1. तलाठी सज्जा आनाळा ,परंडा, अंबी,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रु. दराच्या 44चलनी नोटा एकुण 22000 रु. | 22,000.00 |



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

22,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 20.06.2023
-:फिर्याद:-
मी किरण गोकुळ औसरे, वय 25 वर्ष, व्यवसाय शेती, रा. इनगोदा ता. परंडा जि.उस्मानाबाद मो.नंबर 8788408079
समक्ष पोलीस ठाणे, अंबी येथे हजर राहुन फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा राहणार असुन शेती व्यवसाय करुन मी माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे. दि. 22.11.2022 रोजी मी अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद यांचे समक्ष आनाळा शिवार येथे तक्रार दिली की, माझे आजोबा नामे रंगनाथ कृष्णा औसरे यांच्या नावे मौजे इनगोदा येथे गट नंबर 190, 191, 225, 307, 377, 380 मध्ये आडीच एकर जमीन आहे. सदर जमीनीचा फेर माझे वडील नामे गोकुळ रंगनाथ औसरे यांच्या नावे घेण्यासाठी माझा भाऊ अभिमान हा साधारण 15 दिवसापुर्वी तलाठी कार्यालय आनाळा येथे जावुन तलाठी मुकादम यांना वडीलांचे नावे फेर घेणेकरीता बोलला होता. त्यानंतर सदरचा फेर घेतला का नाही या बाबत तलाठी यांना दिनांक 15.11.2022 रोजी भेटून फेर बाबत विचारले असता तलाठी साहेब यांनी मला तुमच्या वडीलांच्या नावे फेर घेवुन ऑनलाईन सातबाऱ्याला नाव घेण्यासाठी तुम्हाला 40,000/- रुपये दयावे लागतील तरच तुमचा फेर ओढुन ऑनलाईन सातबाऱ्याला नाव घेण्यात येईल असे म्हणाले होते. तलाठी मुकादम साहेब हे मागत असलेले 40,000/- रुपये ही कोणतीही शासकीय फि नसुन लाचच आहे. वगैरे मजकुराची सविस्तर तक्रार दिली होती. सदरची तक्रार हुलगे साहेब यांनी पोकॉ / तावसकर यांना टंकलिखीत करण्यास सांगितलेवरुन त्यांनी टंकलिखीत केली. टंकलिखीत केलेली तक्रार व मी तोंडी सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर पो.नि. हुलगे साहेब व उपस्थित शासकीय पंचांनी त्यावर सहया केल्या.
त्यानंतर त्यांनी मला कळविले की,माझ्या तक्रारीचे अनुषंगाने तलाठी मुकादम यांची माझे कामासाठी लाचेची मागणी आहे किंवा नाही याबाबत पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याबाबत खुलासा करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी सिध्द झाल्यास लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल. तसेच त्यांनी दोन्ही पंचांची पंच म्हणुन कामकरण्याची सहमती घेवुन श्री. दादासाहेब पुरुषोत्तम जगताप, वय 41 वर्ष, व्यवसाय - कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद रा. शांती निकेतन कॉलनी, उस्मानाबाद यांची पंचक्र.01 म्हणुन तर श्री. अभिजीत अशोकराव पाटील, वय 42 वर्ष, व्यवसाय - कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय उस्मानाबाद रा. माणिक चौक, उस्मानाबाद यांची पंचक्र.02 म्हणुन नेमणुक केली. त्यानंतर हुलगे साहेब यांनी मला सांगितले की, लाचमागणी पडताळणीत व्हाईसरेकॉर्डरचा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोना / शेवाळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना / शेवाळे यांनी त्यांचेकडे असलेल्या काळ्यारंगाच्या बॅगमधुन व्हॉईसरेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचाना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व एक नवीन मेमरीकार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसले बाबत खात्री करुन दिली. त्यानंतर हुलगे साहेब यांनी माझे तसेच तलाठी मुकादम यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असले बाबत सांगितले. त्यानंतर पो.नि. हुलगे साहेब यांनी मला तलाठी मुकादम हे कोठे भेटतील असे विचारले असता, मी तलाठी मुकादम यांची तलाठी कार्यालय, अनाळा येथे भेट होईल.असे सांगीतले.
त्यानंतर हुलगे साहेब यांनी लाचमागणी पडताळणी अनुषंगाने मला सुचना दिली की, मी तलाठी मुकादम यांची पंचासमक्ष भेट घेवुन त्यांना स्वतःच्या कामासंबंधी बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागून घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने सुचना दिल्या.
त्यानंतर पो.नि.हुलगे साहेब यांनी पोना / शेवाळे यांना सुचना दिल्याने त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे



Scanned with CamScanner

आतमध्ये असलेल्या बनीयनला डाव्या बाजुला पिनने लावुन तलाठी मुकादम यांची भेट घेण्यासाठी मला व पंचक्र.1 यांना माझेकडील मोटार सायकलने तलाठी कार्यालय, आनाळा येथे रवाना केले. आम्ही मोटार सायकलने तलाठी कार्यालय, आनाळा येथे गेलो तेथे बाजुला मोटार सायकल लावली. त्यांनतर आम्ही तलाठी कार्यालयात पायी चालत गेलो. त्यावेळी मी पंच क्र 1 यांना इशारा करुन खुनविले की, खुर्चीवर बसलेले हेच ते तलाठी मुकादम आहेत. त्यांनतर मी इतर व्यक्तीशी बोललो व नंतर आम्ही तलाठी मुकादम यांचे जवळ गेलो तेथे तलाठी मुकादम व माझेत कामासंबंधी बोलने झाले. त्यावेळी तलाठी मुकादम यांनी मला चुलत्याला फोन लावण्यास सांगितला त्यावरुन मी माझे चुलते आनंता औसारे यांना फोन लावुन बोललो. सदर फोनवरील संभाषणामध्ये मला माझ्या चुलत्यांनी आबारावला साडेसात हजार रुपये पाठविल्याचे सांगितले. त्यानंतर तलाठी मुकादम यांनी मला काय विषय क्लिअर झाला तुमचा असे म्हणाले त्यावर मी त्यांना किती मजी किती दयावे लागतील साहेब सगळे.. असे विचारले असता त्यावर तलाठी मुकादम यांनी त्यांनी सत्तावीस सांगितले होते.. आता काय म्हणतेत ती.. असे म्हणाले. त्यावर मी तलाठी मुकादम यांना सात हजार पाठविलेत.. असे म्हणालो असात तलाठी मुकादम यांनी साडेसात हजार पाठवलेत.. असे म्हणालो. त्यानंतर तलाठी मुकादम यांनी मला तुमच साडेसात अनं ती साडेसात.. असच की पंधरा मधी करा अस .. म्हणायच विषय हा ना.. अभिमानचा .. तेच म्हणताय ना तस.. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना हं.. अभिमानच म्हणन तसच हाय... असे म्हणाले. त्यांनतर तलाठी मुकादम यांनी मला पंधरामधीच करा... असे म्हणाले त्यावर मी तलाठी मुकादम यांना किती काय ...असे म्हणालो असता तलाठी मुकादम यांनी मला चुलता म्हणला होता सत्तावीस हो..परत तो पैसे आनुन देतो...असे म्हणाले. त्यावर मी तलाठी मुकादम यांना चुलत्याच काय सांगायला येत नाही..साहेब ती बगना आता..साडेसात पाठवले..तुम्हाला सत्तावीस होय म्हणुन गेले.. असे म्हणालो. त्यावर तलाठी मुकादम यांनी त्याचे साडेसात अन तुमचे चौदा दया..अन पुन्हा बाकीचे घेतो मी त्याच्याकडुन मी घेतो बरोबर..त्याचा ठिवतो सात बारा..बराच दिवस काय..काय ठिवायचा ती मला..नका टेन्शन घिवु... असे म्हणाले. त्यावर मी तलाठी मुकादम यांना मग टोटल किती दयायचे आता... असे विचारले असता तलाठी मुकादम यांनी साडेबावीस दया... असे म्हणाले. त्यावर मी तलाठी मुकादम यांना आता बावीस देवु का... असे विचारले असात तलाठी मुकादम यांनी हु असे म्हणुन 22,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी पंच क्र 1 यांना तेथुन निघण्याचा इशारा केल्याने मी व पंच क्र 1 असे दोघे मिळून मोटार सायकलने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर पोना / शेवाळे यांनी माझाजवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन, बंद करुन हुलगे साहेबांकडे दिला. तेव्हा हुलगे साहेब यांनी मला सापळा पथक थांबलेल्या ठिकाणा पासुन थोडे लांब थांबण्यास सांगितले. नंतर काही वेळाने मला त्यांचे जवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचने वरुन पोना / शेवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने आमचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली. यावरुन तलाठी मुकादम यांनी माझे वडीलांचे नावे शेत जमीनीचा फेर घेवनु ऑनलाईन सातबाऱ्याला नाव घेण्यासाठी 22,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याच आम्हा सर्वांची खात्री झाली. त्यानंतर हुलगे साहेब यांनी व्हॉईसरेकॉर्डरमधील सदरचे मेमरीकार्ड पुराव्या कामी ताब्यात घेतले.

त्यानंतर पोनि हुलगे यांनी मला कळविले की, तलाठी मुकादम यांनी तुमचेकडे तुमच्या वडीलांचे नावे शेत जमीनीचा फेर घेवनु ऑनलाईन सातबाऱ्याला नाव घेण्यासाठी 22,000/- रुपये लाचेची मागणी केली असुन सदरची लाच रक्कम आज दिनांक 22.11.2022 रोजी तलाठी मुकादम यांना देणार आहे त्यांचेविरुध्द लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर पो.नि.हुलगे यांनी कळविले की, त्यापुर्वी लाचेच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याची सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्या सुचनेवरुन मी माझ्याजवळील मोटारसायकलची चावी, मोबाईल, हातरुमला व रोख रक्कम असे साहित्य त्यांचे समोर काढुन ठेवले. मग त्यांनी अँन्थ्रासिन पावडर लावणे, अँन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्म व अल्ट्राव्हायोलेटच्या दिव्याचा उपयोग याबाबत आम्हास माहिती दिली. त्यानंतर त्यांचे सुचने वरुन पोकॉ / आचार्य यांनी मी सोबत आणलेल्या 500/- रुपये दराच्या 44 चलनी नोटा असे एकूण 22,000/- रुपये लाच रक्कमेला अँथ्रासीन पावडर लावुन त्या नोटांची शासकीय वाहनात केलेल्या कृत्रीम अंधारात अल्ट्राव्हायोलेटच्या लॅम्पने तपासणी केली असता त्यावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. नंतर त्या नोटा पोकॉ / आचार्य यांनी माझ्या अंगावरील पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात अलगत ठेवुन दिल्या. त्यानंतर हुलगे साहेब यांनी तलाठी मुकादम हे कोठे भेटतील याबाबत विचारणा केली असता त्यावेळी मी त्यांना फोन करुन विचारणा करतो असे सांगितले. त्यांनतर पो.नि.हुलगे साहेब यांचे सुचनेवरुन पोना / शेवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन माझे व तलाठी मुकादम यांचे फोनवर होणारे संभाषण रेकॉर्ड केले. त्यावरुन मी हुलगे साहेब यांना म्हणालो की, तलाठी मुकादम हे तुमच्या प्रकरणात मला जास्तच शकच



Scanned with CamScanner

यायलाय. त्यामुळे ते माझेवर संशंय घेत आहेत. तसेच ते म्हणाले आहेत की, ' जमत असल तर तुम्हाला वेळ लागत असल तर आबा पशी पोहच करा.. माझ्यापशी पोहच होतय.. मी आबाला बोलावुन घेतो '. तसेच ते असेही म्हणाले आहेत की, ' घरी जावा म्हणल भेटतो तुम्हाला परत'. यावरुन सापळा कारवाई माझे घरी केली तर माझे चलुते धनु आबा यांना तलाठी मुकादम हे सोबत माझ्या घरी घेवुन येतील व त्यांना लाच रक्कम 22,000/- रुपये घेण्यास सांगतिल त्यामुळे मला माझे चलुते धनु आबा यांना सदर प्रकरणात मध्यस्थी करायचे नाही तरी मी आपणास काही दिवसानंतर फोन केल्यानंतर आपण आनाळा येथे येवुन पुढिल कारवाई करावी असे कळविले.
त्यानंतर हुलगे साहेब यांनी माझ्याशी, दोन्ही पंचांशी व सापळा पथक यांच्याशी विचार विनिमय करुन सदरची सापळा कारवाई स्थगित केली. त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेले 22,000/- रुपये हे जप्त करण्याचे सांगुन त्यांनी सदरचे 22,000/- रुपये माझेकडून घेवुन एका लिफाफामध्ये घालुन तो लिफाफा चिकटवुन त्यावर त्यांनी व पंचानी सहया केल्या.
त्यानंतर दिनांक 11.12.2022 रोजी हुलगे साहेब हे आनाळा येथे येवुन पुढिल कारवाई बाबत मला विचारणा केली असता मी त्यांना तलाठी मुकादम साहेब हे सुटटीवर असल्याचे मला समजले आहे आपण थोडया दिवसांनी पुन्हा आनाळा येथे येवुन पुढिल कारवाई करावी असे कळविले होते.
त्यानंतर दिनांक 12.02.2023 रोजी हुलगे साहेब हे आनाळा येथे येवुन पुढिल कारवाई बाबत मला विचारणा केली असता, मी त्यांना मी शेतातील ऊस खुरपने, खत टाकणे व बांधणी करणे अशा कामात व्यस्त असुन मला वैयक्तीक घरगुती अडचणी असल्याने मी आपणास कळवितो त्यावेळी आपण आनाळा येथे येवुन पुढिल कारवाई करावी असे कळविले होते.
त्यानंतर दिनांक 26.03.2023 रोजी हुलगे साहेब हे आनाळा येथे येवुन पुढिल कारवाई बाबत मला विचारणा केली असता मी त्यांना माझे आई, वडील व आजोबा यांना कोराना झाला असल्याने तसेच शेतातील ऊस बांधणीचे काम चालु असुन मला अजुन वेळ लागेल तरी मी आपणास कळवितो त्यावेळी आपण आनाळा येथे येवुन पुढिल कारवाई करावी असे कळविले होते.
त्यानंतर दिनांक 05.06.2023 रोजी मी हुलगे साहेब यांना फोन करुन आपण दिनांक 06.06.2023 रोजी आनाळा शिवार येथे पुढिल सापळा कारवाई कामी येणे बाबत कळविले होते. त्यावरुन दिनांक 06.06.2023 रोजी पो.नि.हुलगे साहेब यांनी मला फोन व्दारे आनाळा शिवारात सुरक्षीत ठिकाणी आम्ही आलो असुन तेथे मला येणे बाबत कळविले. त्यांनतर मी काही वेळाने आनाळा शिवारात सुरक्षीत ठिकाणी थांबलेल्या सापळा पथकाजवळ आलो असता तेथे पो.नि.हुलगे साहेब स्टाफ व दोन शासकीय पंचासह हजर होते. त्यानंतर मी पो.नि.हुलगे साहेब यांची भेट घेतली. त्यानंतर पोनि हुलगे यांनी मला कळविले की, दिनांक 22.11.2022 रोजी तलाठी मुकादम यांनी तुमचेकडे तुमच्या वडीलांचे नावे फेर घेवुन ऑनलाईन सातबाऱ्याला नाव घेण्यासाठी 22,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर पो.नि.हुलगे साहेब यांनी दिनांक 22.11.2022 रोजी लाच रक्कम 22,000/- रुपये लिफाप्यात पो.नि.हुलगे साहेब व पंचाच्या सहीचे सिल केलेलला लिफाफा मला दाखविला. सदर लिफाफा हा सिलबंद असल्याची मला खात्री झाली.त्यानंतर पोनि हुलगे यांनी माझ्याशी, दोन्ही पंच व सापळा पथक यांच्याशी विचारविनिमय करुन तलाठी मुकादम, तलाठी कार्यालय आनाळा यांचे विरुध्द आज रोजी लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर हुलगे साहेब यांनी मला लोकसेवक तलाठी मुकादम हे कोठे भेटतील याबाबत विचारणा केली असता मी त्यांना तलाठी मुकादम यांना फोन करुन विचारणा करतो असे कळविले, तेव्हा हुलगे साहेब यांनी कळविले की, मी तलाठी मुकादम यांना फोन केल्यानंतर त्यांचेत होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार आहे. त्यावरुन मला सुचना दिली की, आपण तलाठी मुकादम यांना त्यांचे मोबाईलवरुन फोन करुन फोनचा स्पिकर ऑन करावा व 22,000/- रुपये घेवुन कोठे यावे याबाबत विचारावे. तसेच पोकॉ / बेळे यांना सुचना केली की त्यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन तक्रारदार व तलाठी मुकादम यांचेत फोनवर होणारे संभाषण रेकॉर्ड करावे. त्यावरुन पोकॉ / बेळे यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SD HC- I असे वर्णन नमूद असलेले मेमरीकार्ड टाकले. सदर व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले नसले बाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून देण्यात आली. त्यानंतर हुलगे साहेब यांचे सुचनेवरुन मी माझे मोबाईल वरुन तलाठी मुकादम यांच्या मोबाईलवर 14.55 वा. फोन केला असता, तलाठी मुकादम यांनी माझा फोन उचलला नाही. त्यानंतर मला व पोकॉ / बेळे यांना वरील प्रमाणे सुचना देवुन तक्रारदार यांना तलाठी मुकादम यांना त्यांचे मोबाइलवर 1500 वा. फोन केला असता, तलाठी मुकादम यांनी माझा फोन उचलला नाही. त्यानंतर मला व पोकॉ / बेळे यांना वरील प्रमाणे सुचना दिल्या व मीं तलाठी मुकादम यांना त्यांचे मोबाइलवर 15.09 वा. फोन केला असता, तलाठी मुकादम यांनी माझा फोन उचलला नाही. त्यानंतर मला व पोकॉ / बेळे यांना वरील प्रमाणे सुचना दिल्या व मी तलाठी मुकादम यांना



Scanned with CamScanner

त्यांचे मोबाइलवर 15.09 वा. फोन केला असता, तलाठी मुकादम यांनी माझा फोन उचलला नाही. त्यानंतर हुलगे साहेब यांनी मला दुसऱ्या क्रमांकावरुन फोन करण्यास सांगितला व पोकॉ / बेळे यांना वरील प्रमाणे सुचना देवुन तलाठी मुकादम यांना माझे मोबाईल क्रमांकावर फोन करण्यास सांगितला त्यावरुन मी तलाठी मुकादम यांना त्यांचे मोबाइलवर 17.36 वा. फोन केला असता, तलाठी मुकादम यांनी माझा फोन उचलला नाही. त्यानंतर हुलगे साहेब यांनी मला दुसऱ्या क्रमांकावरुन फोन करण्यास सांगितला व पोकॉ / बेळे यांना वरील प्रमाणे सुचना देवुन तलाठी मुकादम यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करण्यास सांगितला त्यावरुन मी तलाठी मुकादम यांना त्यांचे मोबाइलवर 17.53 वा. फोन केला असता, तलाठी मुकादम यांनी माझा फोन उचलला नाही. त्यानंतर हुलगे साहेब यांनी मला दुसऱ्या क्रमांकावरुन फोन करण्यास सांगितला व पोकॉ / बेळे यांना वरील प्रमाणे सुचना देवुन तलाठी मुकादम यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करण्यास सांगितला त्यावरुन मी तलाठी मुकादम यांना त्यांचे मोबाइलवर 17.56 वा. फोन केला असता, तलाठी मुकादम यांनी माझा फोन उचलला नाही.
त्यानंतर मी हुलगे साहेब यांना कळविले की, खुप दिवस झाल्याने तलाठी मुकादम साहेब यांना माझा संशंय आला असेल व तलाठी मुकादम साहेब हे आता माझ्याकडून लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता कमी आहे. तरी थोडे दिवसानंतर आपण मी फोन केल्यानंतर आनाळा येथे येवुन पुढिल कारवाई करावी.
त्यानंतर हुलगे साहेब यांनी दिनांक 22.11.2022 रोजी सापळापुर्व कारवाई दरम्यान अँथ्रासीन पावडर लावलेले 22,000/- रुपये जप्त करुन सदरचे 22,000/- रुपये एका लिफाफामध्ये घालुन तो लिफाफा चिकटवुन त्यावर त्यांनी व पंचानी सहया केलेला सिलबंद लिफाफा मला व दोन्ही पंचाना दाखविला. सदरचा लिफाफा सिल बंद असल्याची माझी व पंचाची खात्री झाली. त्यानंतर सदर सिलबंद लिफाफा पोलीस निरीक्षक श्री. हुलगे यांनी पुराव्या कामी स्वत:चे ताब्यात घेतला.
त्यानंतर दिनांक 19.06.2023 रोजी मी हुलगे साहेब यांना फोन करुन आपण दिनांक 20.06.2023 रोजी आनाळा शिवार येथे पुढिल कारवाई कामी यावे असे कळविले होते. त्यावरुन दिनांक 20.06.2023 रोजी हुलगे साहेब यांनी मला फोन व्दारे आनाळा शिवारात सुरक्षीत ठिकाणी आलो असुन तेथे मला येणे बाबत कळविले. त्यांनतर मी काही वेळाने आनाळा शिवार त सुरक्षीत ठिकाणी थांबलेल्या सापळा पथकाजवळ आलो असता तेथे हुलगे साहेब हे त्यांचा स्टाफ व दोन शासकीय पंचासह हजर होते. त्यांनतर मी हुलगे साहेब यांची भेट घेतली व त्यांना सांगितले की, तलाठी मुकादम हे माझा फोन उचलत नाहीत तसेच सध्या त्यांचा मोबाईल बंद आहे. तसेच तलाठी मुकादम यांची आनाळा येथुन दुसरीकडे बदली झाली असल्याचे व माझे फेरचे काम झाले आहे. तलाठी मुकादम साहेब यांना माझा संशंय आल्याची माझी खात्री झाली आहे त्यामुळे तलाठी मुकादम हे माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत. त्यावर मला हुलगे साहेब यांनी फिर्याद देण्यास सांगितले. त्यावरुन माझी फिर्याद पोशि / तावसकर यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत करुन घेतली.
एकंदरीत दिनांक 22.11.2022 रोजी माझे आजोबाचे नावे असलेल्या शेत जमीनीचा माझे वडील नामे गोकुळ रंगनाथ औसरे यांच्या नावे फेर घेवुन ऑनलाईन सातबाऱ्याला नोंद घेण्यासाठी तलाठी मुकादम यांना तलाठी कार्यालय, आनाळा येथे भेटलो असता, तलाठी मुकादम यांनी 22,500/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 22,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे.
तरी श्री. महेश मुकादम, तलाठी सज्जा, आनाळा ता. परंडा जि. उस्मानाबाद यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मी आज दिनांक 20.06.2023 रोजी माझी फिर्याद देत आहे.
हिच माझी फिर्याद असुन सदरची फिर्याद मी वाचुन पाहिली, ती बरोबर व खरी आहे.
समक्ष



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VIKRANT Dileep HINGE(SI (Sub-Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.:** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, आंबी ता.भूम

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** VIKRANT Dileep HIN
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):**



Scanned with CamScanner